MHGA010002922021

**<u>मोटार अपघात तक्रार निवारण प्रकरण क्र.२४/२०२१ मधील निशानी ५ खालील आदेश</u>**

अर्जदार श्रीमती सुशिला भिमराव तुमरेटी यांनी दिलेला निशानी ५ चा अर्ज संक्षिप्तमध्ये असा आहे की, अर्जदाराचे पती भिमराव मानु तुमरेटी हे मोटार वाहन अपघातात जखमी होवुन त्यांचा मृत्यू झाल्याने त्यांच्या मृत्यूचा विनादोष अपघाताची नुकसान भरपाई रक्कम रुपये ५०,०००/- मिळणेकरीता कलम १४० मोटार वाहन अधिनियम १९८८ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

२. तारीख १७.६.२०२० रोजी ५.४५ वाजताचे दरम्यान मृतक भिमराव मानु तुमरेटी हे गोगाव ते गडचिरोली महिंद्रा झायलो वाहनात प्रवास करीत असतांना कठाणी नदीचे पुलावर महिंद्रा झायलो चारचाकी वाहन नोंदणीकृत क्र.एमएच १४ सीएक्स ६००३ चा चालक अभिजीत बाबुराव मडावी याने सदर वाहन अति वेगाने व निष्काळजीपणाने चालविल्याने चिंचेच्या झाडाला धडक दिल्याने मयत भिमराव तुमरेटी जखमी झाले आणि त्यामुळे ते मयत झाले. सदर अपघाताबद्दल गडचिरोली पोलीस स्टेशनला गैरअर्जदार क्र.१ व २ विरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला. अपघाताचे वेळी सदर वाहनाचे गैरअर्जदार क्र.१ हे चालक, गैरअर्जदार क्र.२ हे मालक व गैरअर्जदार क्र.३ हे विमाकार आहेत.

३. गैरअर्जदार क्र.२ तर्फे त्यांचे विधीज्ञ यांनी निशानी ३२ वर लेखी बयानातील विशेष कथनात दाखल केले की, गैरअर्जदाराचा तथाकथीत अपघाताशी कोणताही संबंध नाही. सदरचा अपघात वाहन चालकाच्या चुकीमुळे घडला आणि वाहन चालकच मयताच्या मृत्यूस कारणीभुत आहे. घटनेच्या वेळेस गैरअर्जदार क्र.२ सदर वाहनाचे मालक नव्हते. गैरअर्जदार क्र.२ ने सदरचे वाहन सुनिल वाघ यांचेकडुन आताच खरेदी केले होते. त्यामुळे गैरअर्जदार क्र.२ नुकसान भरपाई देण्यास बाध्य नाही.

४. गैरअर्जदार क्र.३ तर्फे त्यांचे विधीज्ञ यांनी निशानी ३२ वर लेखी बयानात कथन केले की, गैरअर्जदाराचा तथाकथीत अपघाताशी कोणताही संबंध नाही. सदरचा

अपघात गैरअर्जदार क्र.१ च्या चुकीमुळे घडला व गैरअर्जदार क्र.१ मयताचे मृत्यूस कारणीभुत आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र.३ नुकसान भरपाई देण्यास बाध्य नाही.

५. अर्जदार व गैरअर्जदाराचे विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी अर्जातील कथनाप्रमाणे युक्तिवाद केला. दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांची पाहणी केली.

६. निशानी ४ मधील अ.क्र.१ ते १४ वर दाखल केलेले अर्जदार क्र.१ ते ३ चे आधार कार्ड, मयताचे मृत्यू प्रमाणपत्र, एफआयआर, घटनास्थळ पंचनामा, मरणान्वेशन प्रतिवृत्त, शवविच्छेदन अहवाल, फार्म एए, अपघाताचा तपशिल, इंशुरन्स कॉपी, वाहण नोंदणी प्रमाणपत्र, मयताचे जन्म प्रमाणपत्र, मयताचे आधार कार्ड व मयताचे दुकान नोंदणी प्रमाणपत्र इ. कागदपत्रावरुन असे दिसुन येते की, दि.१७.६.२०२० रोजी ५.४५ वाजताचे दरम्यान मृतक भिमराव मानु तुमरेटी हे गोगाव ते गडचिरोली महिंद्रा झायलो वाहनात प्रवास करीत असतांना कठाणी नदीचे पुलावर महिंद्रा झायलो चारचाकी वाहन नोंदणीकृत क्र.एमएच १४ सीएक्स ६००३ चा चालक अभिजीत बाबुराव मडावी याने सदर वाहन अति वेगाने व निष्काळजीपणाने चालविल्याने चिंचेच्या झाडाला धडक दिल्याने मयत भिमराव तुमरेटी जखमी झाले आणि त्यामुळे ते मयत झाले. सदर अपघाताबद्दल गडचिरोली पोलीस स्टेशनला गैरअर्जदार क्र.१ ते ३ विरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला. सबब गैरअर्जदार क्र.१ वाहन चालक, गैरअर्जदार क्र.२ वाहन मालक व गैरअर्जदार क्र.३ विमाकार या नात्याने अर्जदाराला विनादोष नुकसान भरपाईची रक्कम रुपये ५०,०००/— मो.वा.का. कलम १४० प्रमाणे देण्यास वैयक्तिक जबाबदार आहे. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात आला.

२. अर्जदार हे गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांचेकडुन वैयक्तिकरित्या व संयुक्तिकरित्या विनादोष अपघाताची नुकसान भरपाई रक्कम रुपये ५०,०००/— मिळण्यास पात्र आहेत.

३. अर्जदारांना देय असलेली उपरोक्त रक्कम खाली दिलेल्या खात्यात सदर आदेशाच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आज जमा करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| **Account in the name of Bank** | **:** | **Member, Motor Accident Claim Tribunal, Gadchiroli.** |
| **Name of Bank** | **:** | **State Bank of India, Gadchiroli, Tah. District – Gadchiroli.** |
| **Current A/c No.** | **:** | **40780232739** |
| **IFSC Code** | **:** | **SBIN0000298** |

४. येणेप्रमाणे अंतरीम निवाडा तयार करण्यात यावा.

Ravishankar Namdeorao Bawankar
Digitally signed by Ravishankar Namdeorao Bawankar
Date: 2023.03.24 17:15:40 +0530

दि.२४/०३/२०२३

(र. ना. बावनकर)
सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण
गडचिरोली.